करोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या अधिनस्त कार्यरत विविध परिषदेच्या अंतर्गत नोंदणीकृत वैद्यक व्यावसायिकांच्या सेवा अधिग्रहित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांक:करोना २०२०/ प्र.क्र.६०/६०/वैसेवा-२

गो.ते.रुग्णालय आवार, गो.ते. संकुल, नववा मजला मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

दिनांक :२८ मार्च, २०२०

**प्रस्तावना:-**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४.०३.२०२० च्या अधिसूचनेन्वये राज्यात साथरोग अधिनियम, १८९७ च्या अमंलबजावणी सुरू झाली असून कोवीड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेन्वये साथरोग अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आले असून त्यांच्या कार्यक्षेत्रात कोवीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता ते सक्षम आहेत.

राज्य शासनाच्या अधिनस्त विविध वैद्यकीय परिषदा कार्यरत आहेत. या परिषदेच्या अंतर्गत डॉक्टर, पॅरावैद्यक व्यवसायिक, शुश्रुषा व्यवसायिक इत्यादींची नोंदणी करण्यात येते. या परिषदेअंतर्गत नोंदणी झालेल्या व्यवसायिकांना कोविड-१९ या आजारामुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा पुरविण्याकरिता त्या-त्या जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या व्यवसायिकांच्या सेवा रूग्णहितार्थ प्राप्त करून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून, कोवीड-१९ या साथीच्या आजाराचा होणारा संभाव्य प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाच्या अधिनस्त कार्यरत विविध परिषदेच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या डॉक्टर, पॅरावैद्यक व्यवसायिक, शुश्रुषा व्यवसायिक इत्यादींची कोविड-१९ या आजारामुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवा अधिग्रहीत करून घेण्याचे अधिकार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तसेच त्या-त्या जिल्हयातील अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांना प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार तरुण डॉक्टर यांची कोविड-१९ (करोना विषाणू) बाधित रुग्णांची

व वयस्कर डॉक्टर यांची इतर रुग्णांच्या उपचाराकरिता नियुक्ती करण्यात यावी. तथापि, त्यांनी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने आदेश दिल्यानंतरच प्रत्यक्ष अधिग्रहणाची कार्यवाही सुरु करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. संजय मुखर्जी)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

संचालक, आयुष संचालनालय, मुंबई

प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई / महाराष्ट्र दंत परिषद, मुंबई / महाराष्ट्र आयुर्वेद परिषद /महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई / महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई

सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये / शासकीय दंत महाविद्यालये /शासकीय आयुर्वेद महाविद्यालये

प्राचार्य, शासकीय नर्सिंग महाविद्यालय.

सर्व अधिकारी / कर्मचारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत माहितीसाठी-

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक.